Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)


# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिच्या भावास मारझोड करणा—या आरोपीस न्यायालयाने ठोठावली कारावासाची शिक्षा.

पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर अंतर्गत बाबुपेठ वार्ड चंद्रपुर येथे अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिच्या भावास मारहाण करणाऱ्या आरोपीस १६/०४/२०१९ रोजी **कु. अन्सारी मॅडम, जिल्हा न्यायाधिश क्रं. २ चंद्रपुर** शिक्षा ठोठावली.

दिनांक ०७/१०/२०१२ रोजी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर अंतर्गत बाबुपेठ वार्ड चंद्रपुर येथील अल्पवयीन फिर्यादी मुलगी ही आपल्या मोठया आईसोबत पाणी भरण्याकरीता गेली असता यातील आरोपी नामे नागेश संतोष पिसे, रा. बाबुपेठ वार्ड चंद्रपुर याने तिचा हात पकडुन ओढतान करून तिचा विनयभंग केला. ही हकीकत फिर्यादीने आपल्या घरी सांगीतली, आपल्या बहिनीसोबत घडलेल्या प्रकाराचा जाब विचारण्याकरीता फिर्यादीच्या भावाने आरोपीस हटकले असता आरोपीने त्यास काठीने मारहाण केली व त्यास जखमी केले. प्राप्त तक्रारीवरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे कलम ३५४, ३२४, ३४ भादंवि आणि पोक्सो अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास **तत्कालीन पोउपनि. सुधीर कोडापे, पोस्टे चंद्रपुर शहर** यांनी पुर्ण करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणातील साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १६/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे नागेश संतोष पिसे, वय २० रा. बाबुपेठ वार्ड चंद्रपुर यास पोस्को अन्वये ०३ वर्ष कारावासाची आणि २,०००/—रू दंड, न भरल्यास ०३ महिने शिक्षा कलम ३५४ भादवी अन्वये ०२ वर्ष कारावासाची आणि २,०००/—रू दंड, न भरल्यास ०२ महिने शिक्षा कु. अन्सारी मॅडम, जिल्हा न्यायाधिश क्रं. २ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. महाजन, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन **सफौ. वामन मेश्राम पोस्टे. चंद्रपुर शहर,** यांनी काम पाहिले आहे.

———————————————————————————

चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

०६ एप्रिल, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# दुचाकी चोरास प्रत्येक कलमान्वये न्यायालयाने ठोठावली कारावास व दंडाची शिक्षा.

स्वत:ला पोलीस असल्याचे सांगून चोरीच्या दुचाकी विकणा—या आरोपीस चिमूर पोलीसांनी दोन वर्षापूर्वी अटक केली होती. या प्रकरणात **श्री. छल्लानी, प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, चिमुर** यांनी सोमवारी आरोपीला नोंद असलेल्या प्रत्येक कलमान्वये कारावास आणि दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

सूरज आढळे हा चिमूर तालूक्यातील टेकेपार येथे भाडयाने राहत होता. पोलीसांनी विविध कारवायात जप्त केलेल्या गाडया आपण लिलावाव्दारे खरेदी केल्याचे सांगून त्या विक्री करीत होता, शिवाय त्याने स्वत:च्या दुचाकीवर पोलीसांचा लोगो लावला होता. गेल्या अनेक महिन्यांपासून तो पोलिसाच्या नावाखाली चोरीच्या दुचाकी विकत होता. दरम्यान चिमुर पोलिसांना याची कुणकुण लागताच चिमुर पोलीसांनी सापळा रचुन २० मार्च २०१८ रोजी सूरज यास अटक केली व त्याचे विरूध्द पोस्टे चिमुर येथे भादवी कलम ४२०, १७०, ४६५, ४६८, ४७१ अन्वये गुन्हा नोंद केला. सदर गुन्हयाचा तपास पोस्टे चिमुर येथे नियुक्तिस असलेले तत्कालीन **पोउपनी सुशिल धोपटे** यांनी पुर्ण करून सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणातील साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १५/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे सूरज चंपत आढळे, वय २५ रा. भटाळा, ह.मु. टेकेपार चंद्रपुर यास कलम ४२० भादवी अन्वये ०२ वर्ष कारावासाची शिक्षा आणि ५,०००/—रू दंड, कलम १७० भादवी अन्वये ०६ महिने कारावासाची शिक्षा आणि ५,०००/—रू दंड, कलम ४६५ भादवी अन्वये ०१ वर्ष कारावासाची शिक्षा आणि ५,०००/—रू दंड, कलम ४६८, ४७१ भादवी अन्वये प्रत्येकी ०१ वर्ष कारावासाची शिक्षा आणि १०,०००/—रू दंड अशी शिक्षा श्री. छल्लानी, प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, चिमुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. श्री. संजय ठावरी, सरकारी अभियोक्ता, चिमुर** यांनी काम पाहीले असुन कोर्ट पैरवी म्हणुन **नापोका श्री. बलदेव कुमरे पोस्टे. चिमुर,** यांनी काम पाहिले आहे.